# माकड-मेवा

[ शिशुवर्गासाठी छान-छान गाणी ]

PAID & CANCELLED

विष्णु साठे

म. ग्रं. सं. कॉ. वाचनालय शाखा.
... ग्रंथ ...
क्र. ८५८
विषय बा. सा.

किंमत १ रुपया

BVBK-0400454

रसिक प्रकाशन, पुणे ३०.

# अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| यात्रा | १ |
| कविता | २ |
| काळ्या खाऊ | ३ |
| गर्वाचे घर | ४ |
| पूजा | ५ |
| चेष्टा | ६ |
| एक होता... | ७ |
| आजोबांचा फेटा | ८ |
| प्राण्यांचा फराळ | ९ |
| याद | १० |
| क्रिकेट मॅच | ११ |
| रडत राऊत | १२ |
| जनरल स्टोअर | १३ |
| अगडम बगडम गाव | १४ |
| एक दिवस | १५ |



# यात्रा

नाताळची लागली शाळेला सुट्टी
शेळीण बाईंना आली यात्रेची हुक्की.
वाटले, करडांना घेऊन अरण्यांत जावे
आठ एक दिवस खुप खुप हिंडावे.
मुलांना घेऊन एस्. टी. स्टँडवर गेली
तिकिटांकरता चौकशी केली.
कोल्होबा-कोल्होबा तिकीटे कुठे मिळतील सांग
त्याने दाखवली भली थोरली रांग.
रांगेत उभे राहुन राहुन दुखली कंबर
शेवटी एकदाचा लागला नंबर.
इतक्यात दिसली वाघोबांची सावली
शेळीणबाईंची यात्रा घराकडे वळली.



# कविता

पोपटाने कविता केली
चोचीमधून पडली खाली....

कोकिळीने झेलली गळयात
आणि भरले सारेगम त्यात....

मग कवितेला आला रंग
तिने तर केले माणसालाहि दंग....



# काऊचा खाऊ

एकदा काय झाले —

एका काऊने
कोठून तरी
आणला खाऊ
करून चोरी....

विचार करी
यातील खाऊ
अर्धा-अधीक
चिऊला देऊ....

नदीच्या काठाला
होते झाड
त्यावर बसला
चोर लबाड....

ओरडे काऊ
ये ग ये ग चिऊ
तोच पडला
नदीत खाऊ....

खाऊ गेला तळाशी
काऊ बिचारा उपाशी –




# गर्वाचे घर

हिरवा हिरवा आंबा
उन्हामध्ये न्हायला
ताप त्याला येऊन
लालबुंद झाला.

हिरवे हिरवे काजू
चोरून ऐकू लागले
खट्याळ वाऱ्याने त्यांना
पिवळे धम्मक केले

हिरवे हिरवे अननस
खोटे एकदाच बोलले
काटे बोचून रक्तबंबाळ झाले.

हिरवी हिरवी करवंद
रूपाच्या गर्वाने फुगली
गर्वाचे घर खाली येऊन
काळी कुळकुळीत झाली.



# पूजा

मोर राजा, मोर राजा
सांग ना पवित्र देवपूजा.

माकडा माकडा हुप
पेटव ना जरा थोडा धुप.

हत्ती रे हत्ती
ओवाळना सुगंधी उदबत्ती.

मधमाशीराणी मधमाशीराणी
शिंपडना थोडं गुलाबपाणी.

हो....पण प्रसादाची
काय आहे तयारी ?

मुंगी ग मुंगी
साखर पेरी.

# गर्वाचे घर



हिरवा हिरवा आंबा
उन्हामध्ये न्हायला
ताप त्याला येऊन
लालबुंद झाला.

हिरवे हिरवे काजू
चोरून ऐकू लागले
खट्याळ वाऱ्याने त्यांना
पिवळे धम्मक केले

हिरवे हिरवे अननस
खोटे एकदाच बोलले
काटे बोचून रक्तबंबाळ झाले.

हिरवी हिरवी करवंद
रूपाच्या गर्वाने फुगली
गर्वाचे घर खाली येऊन
काळी कुळकुळीत झाली.



# पूजा

मोर राजा, मोर राजा
सांग ना पवित्र देवपूजा.


माकडा माकडा हुप
पेटव ना जरा थोडा धुप.

हत्ती रे हत्ती
ओवाळना सुगंधी उदबत्ती.

मधमाशीराणी मधमाशीराणी
शिंपडना थोडं गुलाबपाणी.

हो....पण प्रसादाची
काय आहे तयारी ?

मुंगी ग मुंगी
साखर पेरी.




# चेष्टा

देवाला आली
चेष्टेची लहर
एक दिवस त्याने
केलाच कहर....
        सिंह बनला गोगलगाय
        मांजर धरी उंदराचे पाय.
व्यायाम शाळा
काढतो कुत्रा
पदयात्रेला
हत्तींची जत्रा.
        माकडाने काढला इंग्रजीचा क्लास
        जिराफ नि झेब्रा हटकून पास.
आनंदून गेले
गाढव सुस्त
धोब्याला म्हणाले
ओझं नको जास्त.



# एक होता....

एक होता कावळा
खायचा आवळा

एक होता पोपट
मुलखाचा तापट

एक होता पारवा
विकायचा हलवा

एक होता चित्ता
गिरवायचा कित्ता

एक होता हत्ती
खेळायचा कुस्ती

एक होता लांडगा
नेसायचा लेंगा

लेंग्याचे कापड
विणायचा कोल्हा

कोल्हा छान गायचा
पण माणसाला भ्यायचा.



# आजोबांचा फेटा

आजोबांचा निळा फेटा
ऐटबाज त्याचा थाट

झळकतो डोईवर
काय त्याचा थाट माट....

आजोबांचा निळा फेटा
त्याचे बाई लाड किती

जेथे जेथे दूर जाती
तेथे तेथे त्याला नेती....

आजोबांचा निळा फेटा
काय तो त्याचा नखरा


काही नाही काम धाम
उगाच मारी चकरा....

आजोबांचा निळा फेटा
तो घेऊन करू झेंडा

नको नको आले बाबा
हाती त्यांच्या मोठा दांडा....

आजोबांच्या फेट्याला
नका कोणी हात लावु

ते जर त्यांनी पाहिले
तर होईल पाठ मऊ....



# प्राण्यांचा फराळ

काय हो मिस्टर बगळे
तुम्हाला आवडतात ना रायआवळे
काय हो मिस्टर कोल्हे
तुम्हीच खाना पोटभर पोहे
काय हो मिस्टर लांडगे
खाऊन खाऊन किती खाणार सांडगे
काय हो मिस्टर ससे
चावुन चावुन खाना अनरसे
काय हो मिस्टर सरडे
तुमच्यासाठी किती प्रकारचे चिवडे
काय हो मिस् चिऊताई
घ्या ना पिऊन खिरबाई
काय हो मिसेस् खारूताई
हळूच फोडाना ना खारीकबाई
काय हो मिस्टर माकडजी
तुम्हीच फस्त कराना ती करंजी

# याद



चोचीवरून
जीभ फिरविता
कावळोबांनी
ढेकर दिली -

कावळोबा म्हणाले
बेडुकरावांना
" तुमची आठवण
कुणी बरं काढली ? "

" कुणी नाही, कुणी नाही "

त्याच क्षणी
डबक्यामध्ये
बेडकोबांना
उचकी लागली -

पण तुमच्यापासून
दूर पळायची
माझी मलाच
याद आली -



# क्रिकेट मॅच

अरण्यातील स्टेडियमवर प्राण्यांची झाली क्रिकेटची मॅच
पहिल्याच धावेनंतर चिंपाझिने झेलला गोरिलाचा कॅच

कांगारूने काढल्या धावे मागोमाग धावा चिकार
पण गेंडा मात्र खेळला भलताच भिकार

पटांगणावर धावून धावून शहामृगाचा सुकला गळा
बॉलिंगसुद्धा जमत नाही कावळा अगदीच खुळा


नाजुक ससोबांना हलकी-फुलकी पेलवेना बॅट
हंपायर कोल्होबांची बघता बघता हरवली हॅट

आऊट होताच रागाने सिंहिण झाली एकदम तांबडी
मग मात्र सर्वच खेळाडुंची अचानक वळली बोबडी.




# रडत राऊत माकड

मारून मुटकुन धडपडत धडपडत
सैन्यात दाखल झाले माकड
भरती झाल्यापासून बोलतय नवस
घरी परतण्याचे मोजतय दिवस
मशीन गनचा ऐकताच ओरडा
बिचाऱ्याचा घसा पडतोय कोरडा
सिमेवरती होताच गिल्ला
माकड ओरडे आला हल्ला
कानावर येताच लढाईची वर्दी
माकडोबांना झाली लगेच सर्दी
विमानांच्या आवाजाने मोडतेय झोप
माकडाला वाटले उडाली तोफ
मारून मुटकुन रडतखडत रडतखडत
सैन्यात दाखल झाले माकड
आता घरी परतु कसा?
म्हणून रडे ढसाढसा.



# जनरल स्टोअर


सिंहाने सजविले जीवनावश्यक वस्तुंचे दुकान
मॅनेजर म्हणून काम करू लागले माकड बुद्धीमान
जनरल स्टोअसमध्ये होती सामानाची रेलचेल
पाटी-पेन्सिली, वह्या-पुस्तके खूप गमतीदार खेळ
पशु-पक्षांची खरेदीला तिन्ही त्रिकाळ गर्दी
गल्ला मोजून मोजून मालक बनला हिशेबात दर्दी
कोल्होबा म्हणाले, "फुकट द्या हो एक तोळा वेलदोडे"
माकड उत्तरले, "तुम्ही आहात अगदीच वेड्यातील वेडे"
कोकिळाताईंनी मागितला बारीक सुंदर रवा
सिंहोबांनी बजावले पैसा रोकड हवा
लांडगोबाचे लहान पिल्लु लागले उगाच रडू
चौकशी अंती ध्यानी आले बदाम लागले कडू
गल्यावरील मालकाला पाहून शेळी लागली भिऊ
करडाला म्हणाली,
"आज नको सोन्या, उद्याच बाजाराला येऊ"




# अगडम बगडम गाव

साता समुद्रापलिकडे
एक होत टुमदार गाव
अगडबम बगडबम
आहे त्याचे नाव.
गमतीदार गावात
चमत्कारिक प्राणी
त्यांच्या करामतींची
जमतीदार कहाणी.
बगळोबा बावळे
शाळेचे शिपाई
दररोज सांगतात
आज शाळाच नाही
एक जिराफ असा आहे
कसा दिसतो ?

त्याच्या मानेवरती
सदान् कदा ढग बसतो.
आंब्याच्या झाडावर
कोकिळा आहेत खुप
कुहूकुहू म्हणता देतात
एक किलो साखर तुप.
आटोप दुध झोकून हिंडतो
आंडगा दांडगा पैलवान हत्ती
शेपटी फुगवून कुत्रा म्हणतो
चला खेळू कुस्ती.
चार पाखरे घेऊन येतात
डाळ तांदुळ सात सात
बोळक्यामध्ये नेहमी शिजवतात
तीन शेर खिचडी-भात.




# एक दिवस

एक दिवस
कडक ऊन पडले
कावळोबांना
फार उकडू लागले –


ह्याचेवर उपाय
काय करावा.... ?
चटकन् त्यांच्या
मनात आला –

पळत गेले
नदीवर
साबूने
अंग घासले
दगडीवर –

शरीर झाले
रक्तबंबाळ
उष्मा संपून
कायम झाले
गारेगार –

ग्रा. क्र. ४५४
विषय ८१.०१ ...१५


BVBK-0400454




# अगडम बगडम गाव

साता समुद्रापलिकडे
एक होत टुमदार गाव
अगडबम बगडबम
आहे त्याचे नाव.
गमतीदार गावात
चमत्कारिक प्राणी
त्यांच्या करामतींच्या
जमतीदार कहाणी.
बगळोबा बावळे
शाळेचे शिपाई
दररोज सांगतात
आज शाळाच नाही
एक जिराफ असा आहे
कसा दिसतो ?

त्याच्या मानेवरती
सदान् कदा ढग बसतो.
आंब्याच्या झाडावर
कोकिळा आहेत खुप
कुहूकुहू म्हणता देतात
एक किलो साखर तुप.
आटीव दुध झोकून हिंडतो
आडगा दांडगा पैलवान हत्ती
शेपटी फुगवून कुत्रा म्हणतो
चला खेळु कुस्ती.
चार पाखरे घेऊन येतात
डाळ तांदुळ सात सात
बोळक्यामध्ये नेहमी शिजवतात
तीन शेर खिचडी-भात.




# एक दिवस

एक दिवस
कडक ऊन पडले
कावळोबांना
फार उकडू लागले -

पळत गेले
नदीवर
साबूने
अंग घासले
दगडीवर -

ह्याचेवर उपाय
काय करावा.... ?
चटकन् त्यांच्या
मनात आला -

शरीर झाले
रक्तबंबाळ
उष्मा संपून
कायम झाले
गारेगार -

शाखा
ग्रा. क्र. ४५४
विषय
BVBK-0400454